**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ (साक्षीदार) यांचा पुरावा :–**

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करते की,

माझे नांव : मनिषा सुनिल पवार,

वय : ४३ वर्षे, धंदा : शेती,

राहणार : वडाळा महादेव, ता. श्रीरामपुर, जि.अहमदनगर.

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. सी. बी. अग्रवाल यांच्यातर्फे–**

१. मी सर्व आरोपींना ओळखते. मी फिर्यादीला ओळखते. फिर्यादी व आरोपी क्र.१ हे सख्खे भाउ आहेत व इतर आरोपी हे फिर्यादीचे नातेवाईक आहेत. घटनेची तारीख मला आठवत नाही. घटना ही अंदाजे दोन वर्षापुर्वी सकाळी १०.०० वाजताच्या सुमारास वडाळा महादेव येथे आरोपीच्या घराजवळ घडली होती. घटनेच्या वेळेस फिर्यादी व आरोपी क्र. १ दोघा भावामध्ये भांडण सुरु होते. मला आरडाओरड ऐकु आला त्यामुळे मी घटनास्थळावर गेली. त्यावेळेस आरोपी संदिप व त्याचे वडिल आरोपी क्र. ३ हे फिर्यादीला मारहाण करित होते. आरोपी हे कशाने मारहाण करित होते हे मला आठवत नाही. याशिवाय मला काहीही माहिती नाही. माझ्या पतीने फिर्यादी व आरोपींमधील भांडणाची सोडवासोडवी केली होती. फिर्यादीला मारहाणीमध्ये डोक्याला मार लागला होता.

**उलटतपास आरोपी क्र. १ ते ४ करिता वकील के. बी. शेख यांचेतर्फे–**

२. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेबाबत विजयची पत्नी प्रतिभा हिने सांगितले. हे मला आठवत नाही की, मी पोलिसांना बयान देताना असे सांगितले होते की, मला घटनेबाबत प्रतिभा हिने सांगितले होते किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी घटनेच्या वेळेस गेले नाही. फिर्यादी व आरोपी क्र. १ यांच्यामध्ये पुर्वीपासुन जमिनीच्या कारणावरुन वाद आहेत. फिर्यादी यास अर्धा एकर शेती पाहिजे याकारणावरुन त्याचे आरोपी क्र. १ सोबत भांडण आहे. घटना घडल्यानंतर मी घटनास्थळी गेले होते. हे मला माहिती नाही की, विजय यास त्याच्या वडिलांनी टेम्पो हे वाहन घेवुन दिले आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी हे खोटे सांगत आहे की, माझ्या पतीने फिर्यादी व आरोपी यांच्यामधील भांडणाची सोडवासोडव केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी हे खोटे सांगत आहे की, विजय याच्या डोक्याला मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी हे खोटे सांगत आहे की, मी घटनास्थळी गेले तेव्हा आरोपी व फिर्यादीमध्ये मारामारी सुरु होती. मी फिर्यादीसोबत पोलिस स्टेशन येथे गेले होते. पोलिसांनी मला घटनेबाबत विचारपुस केली नाही. मी आजरोजी फिर्यादीसोबत विदयमान न्यायालयात आली आहे. माझे फिर्यादीसोबत चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या सांगण्यावरुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे

म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ठिकाण : श्रीरामपुर.
दिनांक : ०७/०१/२०२५.

**(जितेंद्र दु. जाधव)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, श्रीरामपुर.